पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी-४४
अप्र/११/कावि/ ३५६ /२०१३
दिनांक : ०४/१०/२०१३

प्रति,

मा. ---- ---------------- -

सदस्य/ सदस्या, अ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे-४११०४४

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०९/१०/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०९/१०/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे-४४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ९**

दिनांक: ०९/१०/२०१३ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१३ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०९/१०/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक ११/०९/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता तहकुब करणेत आलेल्या व दिनांक २३/०९/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता घेणेत आलेल्या माहे सप्टेंबर २०१३ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ८) कायम करणे.

विषय क्र. १ अ प्रभाग प्रशासन विभागाकडील मा.प्रभाग अधिकारी व प्रशासन अधिकारी यांचे वाहनाकरीता लागणाऱ्या इंधनाची बीले स्थायी अग्रिमधन मधून वाहन इंधन या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यात येतात. सदर लेखाशिर्षावर सन २०१३-१४ या अर्थिक वर्षामध्ये र.रु. २,००,०००/- तरतूद करणेत आलेली आहे. त्यापैकी दिनांक २५/०९/२०१३ अखेर र.रु. १,९९,५७३/- इतका खर्च झालेला असून र.रु.४२७/- शिल्लक आहे. यापूढील बीले खर्ची टाकणेकामी सदरची रक्कम अपुरी पडत असलेने स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर असलेली एकूण तरतूद र.रु. २,४२,००,०००/- पैकी दिनांक १७/०९/०१३ अखेर शिल्लक असलेल्या र.रु. १,३९,८६,८८३/- मधून र.रु. २,००,०००/- वाहन इंधन या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे-४४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय, निगडी-४४
अप्र/११/कावि/ ३५६ /२०१३
दिनांक : ०४/१०/२०१३